# प्रसिद्धी पत्रक

दिनांक- २१/०६/२०२४

कृषी विभागाच्या आस्थापनेवरील लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्न श्रेणी) व लघुलेखक (उच्च श्रेणी) संवर्गाची सरळसेवा जाहिरात जावक क्रमांक ०१, दिनांक ०६/०४/२०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या होती. त्यानुषंगाने दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजी इंस्टिटयूट ऑफ बँकिंग पर्सनेल सिलेक्शन **(IBPS)** (आय.बी.पी.एस) यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचे निकालपत्रक, संवर्गनिहाय गुणवत्ता यादी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

जाहिरातीनुसार ऑनलाईन परीक्षेमध्ये ४५% व त्यापेक्षा जास्त गुण म्हणजेच ५४ गुण व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त असणाऱ्या उमेदवारांची एकूण ८० गुणांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणेकरिता पात्र उमेदवारांकडून ते कोणत्या भाषेतून लघुलेखन कौशल्य चाचणी देणार आहेत, त्याकरिता विकल्प भरुन घेण्यात येणार असून त्यासाठी आवेदन पत्राची लिंक (Link) पुन्हा खुली करण्यात येत आहे. त्या करिता पात्र उमेदवारांनी मूळ जाहिरातीच्या अनुषंगाने संवर्गनिहाय भरलेल्या आवेदन पत्रासाठी जो नोंदणी क्रमांक व पासवर्ड वापर केला आहे, तोच नोंदणी क्रमांक व पासवर्डचा वापर करुन दि. २५/०६/२०२४ ते दि. ०२/०७/२०२४ या कालावधीत आवेदन पत्रातील आवश्यक माहिती भरावयाची आहे. विहित नमूद कालावधीत आवेदन पत्रातील माहिती न भरल्यास संबंधितास लघुलेखन कौशल्य चाचणी देता येणार नाही. सदरबाबतची लिंक (Link) कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**मा.आयुक्त कृषी यांचे मान्यतेने.**

RJadhav
21/6/24

(राजेश जाधव)
कृषी सहसंचालक (आस्थापना)
कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५

Scanned with CamScanner